# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १४४-२२** **दिनांक :- २०/०५/२०२२**

## पोलीस असल्याची बतावणी करुन जुलमाने पैसे उकळणाऱ्या आरोपीतांना अटक करण्यात नवघर पोलीसांना यश

फिर्यादी नामे श्री. विनोद मौर्या, वय २७ वर्षे, यांचे किराणा दुकान असुन दिनांक ०३/०५/२०२२ रोजी मिळालेल्या ऑर्डरची पुर्तता करण्यासाठी ते स्कुटी मोटार सायकलवर गेले असता इंद्रलोक नाका येथील पानटपरीवर मालाची डिलेव्हरी करीत असतांना तेथे दोन अनोळखी इसम येऊन ते पोलीस असल्याचे फिर्यादी यांना सांगुन "तुम्ही गुटखा विक्री करता" असे बोलुन फिर्यादी यांना एका रिक्षात बसवुन गोल्डन नेस्ट सर्कल येथे नेले. सदर ठिकाणी फिर्यादी यांचेकडे डिलेव्हरी केलेल्या मालाचे मिळालेली रोख रक्कम १८,०००/- रु. जुलुमाने घेऊन निघुन गेले. सदरबाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ३५०/२०२२ भा.द.वि.सं.कलम १७०, १७१, ३८४, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेणेबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे व गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेऊन नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. तपास पथकाने घटनास्थळ व गोल्डन नेस्ट सर्कल तसेच इतर ठिकाणावरुन माहिती प्राप्त केली असता अनोळखी आरोपीतांनी स्कुटी मोटार सायकलचा वापर केला असल्याचे समजुन आले. सदरचा गुन्हा करणारा एक आरोपी सिध्दार्थ रामदास जोहरे, वय ३९ वर्षे, असल्याचे निष्पन्न झाले होते परंतु पोलीसांची चाहुल लागल्याने तो त्याचे राहते घरातुन निघुन पळुन गेला होता. त्यानंतर आरोपीतांचा तांत्रीक माहितीचे आधारे तपास करीत असतांना आरोपी सिध्दार्थ जोहरे हा बदलापुर येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यास ताब्यात घेत असतांना त्याचे साथीदार अब्दुल अहमद खान, वय ५९ वर्षे हे मिळुन आल्याने त्या दोघांना दिनांक ११/५/२०२२ रोजी गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. आरोपीतांनी गुन्हा करतांना वापरलेली स्कुटी मोटार सायकल व पोलीस असल्याची बतावणी करुन लुबाडलेल्या रक्कमेपैकी ८,०००/- रु. रक्कम हस्तगत करुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजीत लांडे, पोहवा/भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि/संदिप जाधव, सुरज घुनावत, ओंमकार यादव विनोद जाधव यांनी केलेली आहे.

------------ooooooo---------------